प्रेस रिलिज

**प्रेस रिलेशन डिव्हीजन**, सेंट्रल ऑफिस, पो.ऑ.बॉक्स ४०६, मुंबई ४००००१
फोन नं.२२६६०५०२, फॅक्स २२६६०३५८, २२७०३२७९

**रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया**
www.rbi.org.in
www.rbi.org.in\hindi
e-mail: helpprd@rbi.org.in

**मे १८, २००६**

# बँक दरांच्या वाजवी आकारणीसंदर्भात योजना बनविण्यासाठी रिझर्व्ह बँकेच्या कार्यकारी गटाची स्थापना

बँकांचे विविध दरांची वाजवी प्रमाणात आकारणी व्हावी या उद्देशाने, आदर्श आचारसंहिता निर्माण करण्यासाठी कार्यकारी गटाची रिझर्व्ह बँकेने आज घोषणा केली. आदर्श आचारसंहितेची अंमलबजावणी होत आहे किंवा नाही यावर, बँकिंग कोड्स ॲन्ड स्टॅन्डर्ड्स बोर्ड लक्ष ठेवणार आहे. कार्यकारी गटाचे सदस्य पुढील प्रमाणेः

१ श्री. एन. सदाशिवन, चेअरमन, बँकिंग लोकपाल, मुंबई
२ श्री. एस. दिवेकर, ऑल इंडिया डिपॉझिटर्स असोसिएशन
३ श्री. एच. एन. सिनोर, मुख्य कार्यकारी अधिकारी, इंडियन बँक्स असोसिएशन
४ श्री. पी. सरन,मुख्य महाव्यवस्थापक , डीबीओडी
५ श्री. काझा सुधाकर, सीजीएम, आरपीसीडी- मेंबर सेक्रेटरी

कार्यकारी गटाचे कार्यक्षेत्र असेः

१) योजना लागू करता येईल अशा, सर्वसामान्य ग्राहकांना दिल्या जाणाऱ्या विविध प्राथमिक बँकिंग/अर्थिक सेवांची निश्चिती करणे.

२) बँकांकडून दिल्या जाणाऱ्या सेवांवरील आकारणी व दर यांसाठी कोणत्या प्रकारची रचना बँकांनी तयार केली आहे. ते धोरण वाजवी ठरविता येईल असे आहे काय हे तपासणे.

३) उपरोल्लेखित क्रमांक २ प्रमाणेच्या धोरणांमध्ये, सेवा दरांची निश्चिती/ बदल करण्यासाठी आवश्यक योजना अंर्तभुत करणे, आणि यासाठी सुयोग्य ठरेल असे धोरण ठरविणे.

४) उपरोल्लेखित क्रमांक ३ संदर्भात, आदर्श आचार संहितेसाठी उपयुक्त सुचना देणे.

५) बँकिंग कोड्स ॲन्ड स्टॅन्डर्ड्स बोर्डच्या, आदर्श आचार संहितेशी निगडीत तरतुदींमध्ये, पुर्ततेसाठी आवश्यक खबरदारीच्या सुचना करणे.

६) इतर संबधित बाबी, असल्यास.

कार्यकारी गटाने जुलै २००६पर्यंत आपला अहवाल सादर करण्याचा आहे.

बँकांच्या अपारदर्शी आणि अवाजवी सेवा करांसंदर्भात नागरिकांकडून आलेल्या तक्रारींचे प्रतिबिंब रिझर्व्ह बँकेच्या वार्षिक धोरण अहवाल २००६-०७ च्या परिच्छेद १६२ मध्ये आपणास दिसेल. सध्याची कार्यप्रणाली यासाठी पुरेशी नाही याचा विचार करुन, बँक दरांमध्ये सुटसुटीतपणा आणण्याच्या दृष्टीने, निश्चित योजना बनविण्यासाठी कार्यकारी गटाची आवश्यकता या धोरणात सुचविली आहे.

**अल्पना किल्लावाला**
मुख्य महाव्यवस्थापक

**प्रेस रिलिज : २००५-२००६/१४९०**